जनसंपर्क कक्ष
0 8 MAY 2022 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गौरव ग्रंथामुळे शाहू विचार राज्यभर

## डॉ. रमेश जाधव यांच्या भावना : शासनाने काम युद्धपातळीवर करावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीतर्फे राजर्षी शाहू गौरव ग्रंथाची दहा हजार प्रतींची चौथी आवृत्ती प्रकाशित करून ती राज्यभरातील शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आणि ग्रामीण भागातील ग्रंथालयांना देण्याच्या राज्य सरकारचा निर्णयाचे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव यांनी स्वागत केले आहे. तिसऱ्या आवृत्तीचे ते संपादक होते. चौथ्या आवृत्तीमुळे शाहू विचारकार्य राज्यभर जाण्यास मदत होईल; परंतु शासनाने हे काम कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून पूर्णत्वास न्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

राजर्षी शाहू गौरव ग्रंथाच्या मूळ पहिल्या आवृत्तीचे संपादक तत्कालीन आमदार व शाहू विचारांचे अभ्यासक पी. बी. साळुंखे हे होते. २३ फेब्रुवारी



१९७६ ला तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी व मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत त्याचे प्रकाशन झाले. त्यावेळी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर लोकांपर्यंत नेण्याची दोन कामे झाले. त्यातील शाहू महाराज यांच्या चरित्र साधनांचा पहिला खंड शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी संपादित केला व शाहू गौरव ग्रंथाचे काम आमदार साळुंखे यांनी केले. त्यामध्ये भर घालून दुसरी आवृत्ती मार्च १९८८ च्या सुमारास यशवंत मनोहर यांनी संपादक म्हणून प्रसिद्ध केली. त्यानंतर तिसरी आवृत्ती निघायला तब्बल तीस वर्षे लोटली. राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार असताना मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी या चरित्र साधने समितीच्या सदस्य सचिवपदी डॉ. रमेश जाधव यांची नियुक्ती २०१३ मध्ये केली. त्यांनी तीन वर्षे अभ्यास करून हा तब्बल १२६८ पानांचा मोठा ग्रंथ प्रकाशित केला. नव्या पिढीतील अभ्यासकांचे ४१ लेख व शाहू महाराज यांच्या समकालीनांच्या नऊ आठवणींचा अशा मिळून एकूण ५० लेखांचा या तिसऱ्या आवृत्तीत जाणीवपूर्वक अंतर्भाव केला आहे. ही आवृत्ती २६ जून २०१६ ला प्रसिद्ध झाली; परंतु ही आवृत्ती त्याच वर्षी संपली असून, शाहू विचार अभ्यासकांना हा ग्रंथ उपलब्ध होत नसल्याचे वृत्त 'लोकमत'ने ६ मे रोजी प्रसिद्ध केले होते. त्याची दखल घेऊन राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समितीतर्फे हा ग्रंथ नव्याने प्रसिद्ध होत आहे.

पुढारी

# विद्यापीठाच्या विधी अधिविभागामार्फत उद्यापासून पाचदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागामार्फत मानव्यशास्त्र इमारत सभागृहात दि. ९ ते १३ मे दरम्यान 'ज्युडिशियल एक्झामिनेशन प्रिपरेशन अँड फंडामेंटल्स् ऑफ कोर्ट प्रॅक्टिस' या विषयावर पाच दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश टी. व्ही. नलावडे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के भूषविणार आहेत. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ.पी. एस. पाटील यांची विशेष उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती विधी विभागाचे प्रभारी अधिविभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी दिली.

पुढारी

# विद्यार्थी, पालकांसाठी कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागामध्ये १५ व १६ मे रोजी सकाळी ११ ते संध्याकाळी ५ या वेळेत बारावी विज्ञान शाखेचे विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी 'नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी ओपन डे' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत तज्ज्ञ प्राध्यापकांसोबत चर्चासत्रे, नॅनो तंत्रज्ञानातील नावीन्यपूर्ण संशोधनाची प्रात्यक्षिके, सुसज्ज प्रयोगशाळांच्या भेटींचा अंतर्भाव असणार आहे. उपस्थितांना प्रायोगिक संशोधन कार्याची प्रात्यक्षिके पाहावयास मिळणार आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थी, पालकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.

0 8 MAY 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे काम डिसेंबरअखेर पूर्ण करणार

## पालकमंत्री सतेज पाटील; शिवाजी विद्यापीठ प्रशासनासमवेत आढावा बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील पद्मश्री कै. डॉ. ग. गो. पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीचे बांधकाम डिसेंबरअखेर पूर्ण करण्याचा मानस आहे. यासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री सतेज पाटील यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामध्ये शनिवारी सकाळी दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक झाली. यावेळी ते बोलत होते. सुरुवातीला पालकमंत्री पाटील यांनी डॉ. ग. गो.जाधव अध्यासनाच्या इमारत बांधकामाची पाहणी करून आढावा घेतला.

यावर्षी १ कोटी रुपये मिळाले आहेत. इमारत बांधकाम करताना डबल पार्किंगसह इतर गोष्टींचा विचार करावा. जिल्हा नियोजन समितीतून इमारतीच्या पुढील बांधकामासाठी निधीची कोणतीही अडचण येणार नाही. परंतु, बांधकामाच्या प्लॅनसह खर्चाचे व्यवस्थित नियोजन करावे. इमारतीच्या पुढील भागातील लँडस्केपिंगचा आराखडा तयार करावा, अशा सूचना पालकमंत्री पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. याप्रसंगी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी आतापर्यंत झालेल्या बांधकामासह इतर गोष्टींची माहिती देत सादरीकरण केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामध्ये आयोजित आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना पालकमंत्री सतेज पाटील. डावीकडून उपस्थित दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. (छाया : पप्पू अत्तार)

डॉ. प्रतापसिंह जाधव म्हणाले, डॉ. ग. गो. जाधव अध्यासन हे देशातील पत्रकारितेचे पहिले अध्यासन आहे. या ठिकाणी देशभरातील नवनवीन कोर्सेस सुरू करता येतील, याचा विद्यापीठाने विचार करावा. येणाऱ्या काळात इतर विद्यापीठांशी सामंजस्य करार करता येतील, यासाठी प्रयत्न करावेत.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी डॉ. ग. गो. जाधव अध्यासनामार्फत नवीन कोर्सेस सुरू करण्यास अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. वर्षभरापर्यंत इमारतीचे बांधकाम पूर्ण होईल, यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता एम. के. पाटील, शाखा अभियंता अनिता पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य संजय जाधव, बांधकाम व्यावसायिक बापू लाड, ठेकेदार सुनील नागराळे, विद्यापीठाचे उपकुलसचिव रणजित यादव यांच्यासह विद्यापीठ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाबाबत १३ मे रोजी पुन्हा बैठक

पालकमंत्री पाटील यांनी आढावा बैठकीत डॉ. ग. गो. जाधव अध्यासन इमारतीच्या बांधकामाचा आराखडा नव्याने सादर करावा, तांत्रिक कमिटीबरोबर याबाबतची चर्चा करावी, अशा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या. पुढील आठवड्यात १३ मे रोजी सायंकाळी ५ वाजता विद्यापीठात बैठक घेऊन पुढील नियोजन केले जाईल, असेही ते म्हणाले.

पुण्यनगरी

# शाहू महाराज बहुआयामी व्यक्तिमत्त्व

## प्रा. डॉ. पी. एस. कांबळे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लोकराजा राजर्षी शाहू महाराज हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले. जिल्हा प्रशासन व न्यू कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोकराजा राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

'लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य व विचार आजच्या युगाकरिता संदेश' या विषयावर प्रा. डॉ. कांबळे बोलत होते. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. संस्थेचे चेअमरन के. जी. पाटील यांनी छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक धोरण याविषयी मत मांडले. डॉ. व्ही. एस. पवार-पाटील यांनी आभार मानले.

सकाळ

# 'नॅनो सायन्स'तर्फे १५, १६ ला कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागात १५ व १६ मे दरम्यान सकाळी ११ ते सायंकाळी ५ पर्यंत 'नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी ओपन डे' कार्यशाळा होत आहे. कार्यशाळा मुख्यतः १२ वी विज्ञान शाखेचे विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आयोजित केली असून त्यात तज्ज्ञ प्राध्यापकांसोबत चर्चासत्रे, नॅनो तंत्रज्ञानातील नावीन्यपूर्ण संशोधनाची प्रात्यक्षिके, सुसज्ज प्रयोगशाळांच्या भेटी यांचा अंतर्भाव असणार आहे.

प्रतिजैविक क्रिया, मेमरिस्टर्स, गॅस सेन्सिंग, लोटस सुपरहायड्रोफोबिक इफेक्ट, नॅनो फायबर्स, अँटी रस्ट कोटिंग स्प्रे, व्हायरस कवच स्प्रे, डिटॉक्सिफिकेशन, चुंबकीय लोलक, टोटल इंटरनल रिफ्लेक्शन, एसी मोटर, ऑप्टिकल इल्युजन पाहायला मिळणार आहे. तरी त्यात विद्यार्थी व पालकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

## आजीवन अध्ययन व विस्तार विभाग

### युवक युवतींना नोकरीची संधी व कौशल्य वृध्दिंगत करणारे प्रमाणपत्र अभ्यासक्रम

* योग शिक्षक –शैक्षणिक पात्रता: १० वी पास (नऊ महिने) शैक्षणिक शुल्क रु. ५,०००/-

### सहा महीने कालावधीचे अभ्यासक्रम

* बालवाडी शिक्षक शिक्षण–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. १,०००/-, पुस्तक/साहित्य शुल्क रु. १३०/-
* प्राथमिक योग शैक्षणिक पात्रता : १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/-

### चार महीने कालावधीचा अभ्यासक्रम

* रोपवाटीका व उद्यान कौशल्य–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. १,०००/-

### तीन महीने कालावधीचे अभ्यासक्रम

* व्यक्तिमत्व विकास–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/-
* इव्हेंट मॅनेजमेंट–शैक्षणिक पात्रता: १० वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/-
* रेडिओ जॉकी कम प्रोग्रॅमर– शैक्षणिक पात्रता: १२ वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५०००/-
* औषधी वनस्पतींची ओळख शैक्षणिक पात्रता: ७ वी पास शैक्षणिक शुल्क रु. १०००/-
* पर्यावरण शिक्षण शैक्षणिक पात्रता: १२ वी पास शैक्षणिक शुल्क रु. १०००/-

---

* सुत्रसंचालन व निवेदन– शैक्षणिक पात्रता:१२ वी पास (४५ दिवस) शैक्षणिक शुल्क रु. २,०००/-
* मोडी लिपी शैक्षणिक पात्रता: शैक्षणिक पात्रता: १२ वी पास शैक्षणिक शुल्क रु. ५००/- (१ महिना)
* व्यक्तीगत सौंदर्य संवर्धन शैक्षणिक पात्रता: १० वी पास (१० दिवस) शैक्षणिक शुल्क रु. ५००/-

टिप: १. वरील सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रवेश शुल्क रु. २५/- व माजी विद्यार्थी शुल्क रु. २५/- भरावे लागतील.

२. वरील अभ्यासक्रमांची माहितीपुस्तिका (Syllabus) शिवाजी विद्यापीठ सेंट्रल कंझ्युमर्स स्टोअर्स (अनेक्स बिल्डिंग) येथे विक्रीस उपलब्ध आहे.

**प्रवेशाची अंतिम तारीख: दि. २५/०५/२०२२**

प्रवेशासाठी व अधिक माहितीसाठी संपर्क साधा

प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव, प्र. संचालक

दुरध्वनी : ०२३१–२६०९१५०/५१

दि. ०८ / ०५/२०२२

डॉ. व्ही. एन. शिंदे

प्र. कुलसचिव

तरूण भारत

# विद्यापीठात बारावी विज्ञान शाखेसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागामध्ये १५ व १६ मे दोन दिवस कार्यशाळेचे आयोजन केले आहे. 'नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी ओपन डे' हा या कार्यशाळेचा विषय आहे. ही कार्यशाळा मुख्यत: १२ वी विज्ञान शाखेचे विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी आयोजित केली आहे. यामध्ये तज्ज्ञांसोबत चर्चासत्रे, नॅनो तंत्रज्ञानातील नाविन्यपूर्ण संशोधनाची प्रात्येक्षिके, सुसज्ज प्रयोगशाळांच्या भेटी आदींचा समावेश आहे. प्रतिजैविक क्रिया, मेमरिस्टर्स, गॅस सेन्सिंग, लोटस सुपरहायड्रोफोबिक इफेक्ट, नॅनो फायबर्स, अँटी रस्ट कोटिंग स्प्रे, व्हायरस कवच स्प्रे, डिटॉक्सिफिकेशन, चुंबकीय लोलक, टोटल इंटरनल रिफ्लेक्शन, एसी मोटर, ऑप्टिकल इल्युजन इत्यादी प्रात्यक्षिक पहावयास मिळणार आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभागाचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे. अधिक माहिती-साठी विभागाशी संपर्क साधावा.